## प्रकरण तिसरे

'बनगरवाडी'तील व्यक्तिचित्रण आणि कथानक

## प्रकरण ३ रे

### "बनगरवाडी"तील व्यक्तिचित्रण आणि कथानक

**प्रस्तावना:**

मागच्या प्रकरणात "बनगरवाडीची प्रादेशिक वैशिष्टये लक्षात घेतली. या वाडीतील माणसांचा स्वभाव कोणता ? जीवनपध्दती कोणती ? त्यांचे परस्पर संबंध कोणत्या प्रकारचे आहेत याचे प्रत्ययकारी चित्रण व्यंकटेश माडगूळकरांनी प्रस्तुत कादंबरीत केले आहे.

या कादंबरीतील व्यक्तिचित्रे रेखाटताना येथे प्रादेशिकता व स्वभाव यांचा काही एक आंतरिक संबंध कादंबरीकाराने उमजून घेतलेला आहे. असेही वाचकांना जाणवते.

या कादंबरीत वस्तुत: पारंपरिक कादंबरीत जिला नायकत्व बहाल केले जाते अशी एकही व्यक्ती कादंबरीकाराने चित्रित केलेली नाही. त्यातल्या त्यात मास्तर ही मध्यवर्ती व्यक्तिरेखा म्हणावी लागेल. याचे कारण या मास्तराच्या नजरेतून कादंबरीकाराने, 'बनगरवाडी' दाखविली आहे. म्हणून प्रथमत: "बनगरवाडी"तील अन्य व्यक्तिरेखा कादंबरीकाराने मास्तराच्या संदर्भात आणि त्याच्या नजरेने कशा चित्रित केलेल्या आहेत हे आपण पाहू.

या बाकीच्या व्यक्तिचित्रणातच मास्तराचे व्यक्तिचित्र आपोआप साकार होते असे म्हणावेसे वाटते.

'बनगरवाडी'चे कथानक थोडक्यात सांगायचे तर राजाराम विठ्ठल सौंदणीकर प्राथमिक शिक्षक म्हणून या वाडीत येतो. मुले नसलेली बंद पडलेली शाळा चालू करतो. मुलाना ज्ञानाबरोबर बलाचीही उपासना शिकवावी म्हणून तालीम बांधतो. गावच्या धनगरांची सर्व कामे करतो, त्यांच्या जीवनाशी

समरस होतो व दुष्काळ पडताच उजाड गावातून बदलीची ऑर्डर आल्याने निघून जातो असे आहे. माणदेशाच्या उजाड माळरानावर बसलेली वस्ती म्हणजे "बनगरवाडी." -- म्हणजे गाव नाही. गावाला असते तशी या वस्तीला सांस्कृतिक-ऐतिहासिक-राजकीय अशी काही परंपरा नाही. तीसचाळीस घरांची मेंढपाळांची ही वस्ती. मेंढरे चारणे, त्या मेंढरांच्या जोरावर जगणे हा इथला प्रमुख व्यवसाय त्या मेंढपाळांना यंत्रयुगाचा अजून स्पर्श झालेला नाही. तसे हे जीवन अनघड आहे. या वस्तीचा परिचय करून देण्यासाठी माडगूळकरांनी राजाराम विठ्ठल सौंदणीकर या पोरसवदा शिक्षकाची निवेदक म्हणून योजना केली. अर्थात हा निवेदक भालचंद्र नेमाडे म्हणतात त्याप्रमाणे "तटस्थ निरीक्षक" नाही. तर तो संवेदनशील आहे व संवेदनशील मनानेच तो "बनगरवाडी"तील जीवन पहात आहे. केवळ तटस्थ राहून तो पहात नाही. तर हळूहळू त्या धनगरी जीवनाशी समरस होऊन जातो. म्हणूनच प्रा. ल..ग. जोग म्हणतात. "तो केवळ लोअर प्रायमरी शिक्षक आहे, तरी त्याची दृष्टी शोधक आहे. आपली कर्मभू धनगरांची आहे हे ओळखायला त्याला अवकाश लागत नाही. पाणी आणणाऱ्या काळ्याभोर पोरीच्या पायावरचे पांढरे धोट फराटे त्याला चटकन् दिसतात... लोकांच्या डोळ्यातून ओसंडणारी भूक या साऱ्यांचे मार्मिक अवलोकन करणारी ही एक वल्लीच आहे."[१] अशा प्रकारचा हा निवेदक केवळ निवेदन करीत नाही तर त्या "बनगरवाडी"त चलनवलन निर्माण करतो. बंद पडत चाललेल्या शाळेला तो जिवंत करतो. ज्ञानाबरोबर बलोपासना व्हावी या हेतूने तो तालीम बांधतो तिचे उद्घाटन "राजा"च्या हस्ते करतो. चोळी शिवून आणून देण्या-पासून नवराबायकोची भांडणे सोडविण्यापर्यंत सर्व कामे तो करतो. तो "बनगर-वाडी"शी किती एकरूप झाला होता याचे उदाहरण द्यायचे झाले तर,

वांगीचे लोक बिनदिक्कत रामोशांच्या लोकांना हाणमार करू लागले तेव्हा तो कणाखरपणे पुढे होतो व त्यांना म्हणतो "तुम्ही तालमीत चला, तिथं तुम्हांला काय पाहिजे, तुम्ही कशासाठी आलाय हे आपण बोलू. उगीच मारामारी करणं ही चांगल्या माणसाला शोभणारी गोष्ट नाही." एका बाईच्या प्रकरणात सगळ्या गावाचे नेतृत्व करणारा हा निवेदक वयाने लहान असला तरी तो प्रसंगाचे गांभीर्य ओळखणारा सुजाण आहे. वरवर दिसणाऱ्या सामान्य पातळीवरचे जीवन जगणारी ही धनगर मंडळी, यांच्याही जीवनात गुंतागुंत, आंदोलने आहेत. ती त्याने अत्यंत संवेदनशीलतेने टिपली आहेत. येथील समग्र जीवन, रीती-भाती, समजूती परंपरा, स्त्री, आणि निसर्गाशी पोटासाठी चाललेला संघर्ष तो पाहतो. कधी निसर्ग चैतन्याने आनंदून जाणारी, तर कधी कोमेजून जाणारी ही मंडळी जे जीवन पिढयान्‌पिढया जगत आले ते कसे आले, हे सर्व सूक्ष्मपणे पहातो. म्हणून द.भि. कुलकर्णी म्हणतात त्याप्रमाणे "ही पात्रे आपापसातील संबंधापेक्षा मास्तराशी आलेल्या संबंधातून दिसतात टॉर्चच्या उजेडाप्रमाणे."[२] तेव्हा ज्या धनगरांच्याबद्दल मास्तरच्या दृष्टीकोणातून ही मंडळी कशी दिसतात, ज्यानिसर्गाच्या तालावर इथले जीवन आंदोलत आहे त्या निसर्गाचा, भूमीचा त्यांच्या व्यक्तित्वावर कोणता परिणाम पडला आहे, या वाडीला तो कसा आकार देतो, इथले जीवन कसे भूसांस्कृतिक वैशिष्टयांनी युक्त आहे, हे मास्तरच्या नजरेतून पाहिल्यास आपणास या धनगरमंडळीच्या व्यक्तित्वाच्या सूक्ष्म छटा नजरेत भरतील.

मुळातच निसर्गाचे फुलारलेपण, सुगी आणि धनगरी जीवनातील आनंद यांचा अन्योन्य संबंध आहे. त्यातच धनगरांच्या प्राथमिक पातळीवरच्या निसर्गाश्रित जीवनदर्शनाने आणि निवेदकाच्या विलक्षण संवेदनशीलतेने ही पात्रे

मनाला चटका लावून जातात.

निवेदक जेव्हा शिक्षकाच्या नोकरीची ऑर्डर घेऊन "बनगरवाडी"त प्रवेश करतो तेव्हाच त्याला दादू बालटया भेटतो व दम देताना आवाज काढावा तसा आवाज काढून "काय अंडीवाला हायेस का गा ?"[3] असे विचारतो. या प्रश्नाच्या फटक्याने तो गार होतो. तर गावात गेल्यावर कारभारी चुकलेले मेंढरू न्याहाळावे तसे न्याहाळून "इतं का बसलास रे बाळा".। असे म्हणतात. तेव्हा "अंडीवाला" -- "बाळा" या दोन शब्दातूनच त्याची या धनगर लोकाबद्दलची प्रतिक्रिया सुरु होते. वेळोवेळी मास्तरांना त्रास देणारा बालटया व वेळोवेळी मदतीचा हात पुढे करणारा कारभारी अशा दोन्ही गटात मोडणाऱ्या लोकांची नोंद मास्तराच्या मनावर केली जाते. गावाविरुध्द जाणारे बालटया, बाळा धनगर, रामोशी तर कारभारी, शेकू, अंजी, शेकूची पत्नी, आयबू, काकुबा ही मास्तरवर जीवापाड प्रेम करणारी मंडळी या मंडळींच्या लेखी मास्तर म्हणजे जज्ज; पोलीस अधिकारी, पाटील-कुलकर्णी आणि स्टँपव्हेंडर-सुध्दा म्हणूनच अंजी मास्तरला चोळी शिवून आणायला सांगते. तर शेकू पेरणीला बैल बघून द्यायला सांगतो. तर शेकूची बायको, शेकू-अंजीचे लफडे मास्तरांना मनमोकळेपणाने सांगते, तर काकुबा रुपये बदलून आणण्यास सांगतो. साऱ्या गावाला मास्तर आपल्या अडी अडचणीला उभा राहतो असा विश्वास आहे. असे असले तरीही या लोकांत सुष्ट-दुष्ट प्रवृत्तीची माणसे मास्तरला दिसतात. पण ती मुळात चांगली आहेत. उदा. आनंदा रामोशी भाकरीचे गाठोडे समजून पैशाचे गाठोडे चोरतो व शेवटी परत आणून देतो. शिवाय आपण केलेली चोरी तो कबूलही करतो. कारण चोरी कबूल केल्यावर चोरीचा "डाग" जातो ही त्याची श्रध्दा आहे. ऐबु मुलाणी निराश्रित, रोटी तुकडयावर कुत्र्यासारखा पडून राहणारा, इमानाला जागणारा आहे. परिस्थितीच्या

रेटयामुळे जणू कर्मभावनाच विसरून गेला आहे. शेकू दुबळा वाटला तरी तो दुबळा नाही. तो बायकोच्या हिमतीवर जगतो असे वाटते पण तो ही स्वप्ने पहाणारा, अंजीच्या सहवासाने फुलारणारा आहे. त्याची बायकोतर (नानी) धीराची बाई आहे. फटलेली पेरणी आणि विझालेले नव-याचे डोळे पाहून लाजमर्यादा सोडून स्वत: औत ओढून पेरणी करते. पुरुषालाही लाजविते. अंजीच्या नादी लागलेला शेकू त्याच्याही मनात नानीबद्दल अपार प्रेम आहे म्हणूनच तो पेरणी संपल्यावर नानीचे अंग मोठया ममतेने "तुडवितो". अशी ही नानी उपजत ज्ञानी आहे, परस्त्रीच्या (अंजीच्या) नादी लागलेला नवरा बळाने माघार घेणार नसतो म्हणून ती मास्तराकरवी कान टोचते. व आपल्या नव-याजवळ दोन बायका सांभाळण्याची ऐपत नाही, हे तिला माहीत असते म्हणूनच ती थंडपणे वेगळे बि-हाड करते व शेवटी "मास्तर आलं आमचं खुळं माघारी" म्हणून आनंदाश्रूंनी पुलकित होते.

बालटया तसा खलप्रवृत्तीचा नाही. गावावर आपले वजन राहावे टिवल्या- -बावल्या करून जगावे. म्हणून तो मास्तरावर दाब ठेवतो. पण गाव सोडताना मात्र त्याला आपल्या लुळया अवस्थेमुळे "राजाला" बघायला मिळाले नाही म्हणून जाता जाता परत आल्यावर मास्तरांचा बदला घेण्याची भाषा बोलतो.

तारुण्याने मुसमुसलेल्या अंजीला (कारभा-याच्या नातीला) मास्तराकडे चोळी शिवायला देताना वेगडी लाज वाटत नाही. व शेकूला नादी लावताना ही काही वाटत नाही. उलट दणाक्ट मैंदक्याने हात धरताच ती वार्धक्याकडे झुकलेल्या शेकूला सहजपणे सोडते. भावनेच्या भरात देवीच्या काचोळीची घेतलेली शपथ तिला महत्त्वाची वाटत नाही.

वाडीच्या सुखदु:खाची जबाबदारी शिरावर घेतलेला म्हातारा कारभारी

जसा सात्त्विक तसाच करारी आहे. गावातील तिरक्स तुंब्यांना फटकावणारा आहे.गावातील इतर लोकांचा झालेला विरोध असताना "बक्कळ पोरं हायत आन् हुत्याल की, दरसाल दहाईस लगीन उभं -हांतंय पोरं हुत्याल. तू शिकवायचं काम कर म्हंजे झालं"[४] असं म्हणून शाळा भरभराटीला आणून देणारा, तालमीसाठी कष्ट उपसणारा, मास्तरांशी जिव्हाळयाने वागणारा प्रसंगी संशय येताच कठोर होणारा व गैरसमज दूर होताच पडते घेणारा, राजाने पाठीवर थाप मारताच मोहरून जाणारा, मृत्यू सांगून मृत्यूला सामोरे जाणारा कारभारी हा मास्तरांचा मार्गदर्शक, साहाय्यक, आणि प्रेरणास्थान होता.

उलट बाळा धनगर आहे. तालमीला झाड देण्यास नकार देणारा आहे. गावाशी फटकून वागणारा, गावही त्याला वाळीत टाकते. पण तो शरण येत नाही. मावल्या आईच्या यात्रेत पुजा-याने त्याला भंडारा लावण्याचे नाकारताच धोत-याच्या नि-या फराफरा फेडून गावापुढे शरण जातो. मुळात तो चांगलाच आहे. जे "झाड" गावाने तालमीला मागितले त्या झाडाखालीच त्याचा प्रपंच थाटलेला होता. जणू ते झाड त्याचे सर्वस्व होते. म्हणूनच तो "झाड" देण्यास नकार देतो.

अशा या लोकांच्यात सामूहिक जीवनाचे काही संकेत होते. देवळापुढे अंधारात बसून चर्चा करणे. ही चर्चा खांडाची, लांडग्यांची, कुत्र्यांची, लांडगा मारणा-याची, त्याच्या बहाद्दुरीची, शाळेत पोरं पाठविताना त्यांच्या पोटाचा प्रश्न या धनगरांच्या डोळयापुढे उभा राहतो व परिस्थितीने शाळेपेक्षा मेंढरे राखली तर पोट तरी भरेल हा समज त्यांचा बनतो. मुलांना शाळेत घालणे, वा गावात तालीम बांधण्याची आवश्यकता त्यांना समजू शकत नाही.

बाहय जगाचे ज्ञान त्यांना नाही. रामा धनगराचा म्हातारा केवळ ७० वर्षे मेंढरे राखतो त्याला दुसरा धंदा माहीत नाही. मात्र कुत्र्याला यावा तसा त्याला लांडग्याचा वास येतो. राखणीला सावध राहून तो बसूनच झोप घेतो. मेंढरांची संतती ओळखतो. तर दारू गाळण्याचा पिढीजात धंदा करणारे रामोशी भुरट्या चो-या हे त्याचे जीवन बनते. किडामुंगी, राघू, कावळे धान्य खातात. त्यांना कोणी विचारत नाही तसे आपणासही कुणी विचारू नये ही त्यांची अपेक्षा. जातपातीची बंधने इथे रूजली आहेत. मराठ्यांची स्त्री बांगीतील रामोश्याने काढून आणताच सारा गाव रामोशांच्या विरूध्द जातो. धनगरांचे महादेवत, सामुदायिक लग्ने, मावल्या आईची यात्रा, देवीचा प्रसाद, अंगात येणे, पांढरीतून वाळीत टाकणे, कारभा-याला झालेला मृत्यूबाबतचा दैवी दृष्टांत, दुष्काळातही गाव न सोडणारा काकुबा, शिकारी माणूस पापाची फळे म्हणून हंबरून मरतो. या श्रध्दाशी, भावनाशी ही माणसे निगडीत आहे. या श्रध्दा, भावना, वर्तनातील त-हा सा-या त्यांना या निसर्गाने शिकविल्या आहेत. पोटासाठी चोरी हा दुष्काळी भागाचाच परिणाम - शाळेपेक्षा मेंढरे चारणे फायद्याचे हे या निसर्गाचे तत्त्वज्ञान बनते. परिस्थितीमुळेच भुकेपोटी आनंदा रामोशी चोरी करतो. सतत मेंढरांची राखण करणा-या वृत्तीनेच बसून झोप घेण्यास काकुबा शिकतो. परिस्थितीने व भौगोलिक वातावरणामुळे उदा. गवत-शेळया मेंढयांची पैदास. त्यांचे दूध, व्यसने नाहीत. त्यामुळे मार खाऊनही बालट्या जिद्दी राहतो. व नानी बैलाबरोबर औत ओढते. काकुबा गाव सोडून दुष्काळातही बनगरवाडीतच राहतो. आणि बाळा धनगर गावाला विरोध करतो, हा इथल्या मातीचा, हवेचा आणि अन्नाचापरिणाम होय. इथे लेचापेचा मनुष्य नाही. ही माणसे परिस्थितीने शहाणी वा मूर्ख ठरतात. ही माणसे जेवढी भोळी

तेवढीच बेरकी, जेवढी विश्वासू तेवढीच प्रेमळ म्हणून हा निवेदक या 'बनगरवाडी'त बनगरवाडीतील एक नागरिक म्हणूनच वावरतो. आयबु, आनंदा, शेकू, शेकूची पत्नी (नानी), कारभारी ही जीवापाड प्रेम मास्तरांच्यावर करतात व बदलीची ऑर्डर हातात पडताच या प्रेमळ माणसांचा निरोप घेताना मास्तर नाही म्हटले तर मनातून "बनगरवाडी" सारखाच उध्वस्त बनतो हे नाकारून चालणार नाही. म्हणूनच "बनगरवाडी"तील या व्यक्तिरेखा मास्तराच्या नजरेतून अशा दिसल्या. तशाच त्या टिपल्या तर या व्यक्तिरेखांची मला वाटते ओळख पटल्यासारखी होईल.

## २. व्यक्तिचित्रण:

### १) कारभारी-

"बनगरवाडी"त पाऊल टाकताच "काय अंडीवाला हायेस का गा ?"[५] या बालटयाच्या फटकाऱ्याने मार खाल्लेले निवेदक मास्तराचे मन दु:खी बनते. या दु:खी मनावर पहिली फुंकर "हतं का बसला रे बाळा ?" अशी विचारणा करून कारभारी घालतो, आणि न कळतच निवेदक कारभाऱ्याचा अंकित बनतो. साऱ्या गावात कारभाऱ्याचा विलक्षण आधार, प्रेम निवेदकाला लाभते. म्हणूनच शेक्टी राजाच्याकडून "काय पाटील, बरे आहे ना ?"[६] या शब्दात कारभाऱ्याला विचारणा होते. हा "पाटीलपणा"चा मान मास्तरांच्यामुळेच कारभाऱ्याला मिळालेला असतो. न कळत कारभाऱ्याच्या मदतीची पोच निवेदक त्याला याचदेही याच डोळा देतो. राजाची पाठीवर थाप पडताच मोहरून जाऊन जीवनाचं सार्थक झालं समजून तो मृत्यूला सामोरे जातो. त्याची पुण्याई एवढी जबरदस्तकी "मावल्या आई" त्याच्या स्वप्नात येऊन मृत्यूचा सांगावा सांगून जाते. तेव्हा "अरे रडता कशापायी ? माजं काय ऱ्हायलंय ?

एवढा मोठा पंतसरकार, त्यानं सुदीम मला काय पाटील" म्हनलं, माझ्या पाठीवर हात ठेवला, माजं काय -हायलं न्हाई आता."[७] अशा शब्दात सार्थकी जीवनाचे उद्गार त्याच्या तोंडातून मृत्यू समयी बाहेर पडतात.

हा जीवनाचा आदर्शवाद या भूमीने कारभा-याला शिकविला. बाहेरचा मास्तर व गावातले लोक कारभा-याला सगळे सारखेच होते. म्हणून तर वेळो-वेळी त्याला दूध, भाकरी, रॉकेलची चिमणी देण्याचे तो सांगत असतो. असा हा कारभारी "बनगरवाडी"च्या सुखदु:खाची जबाबदारी शिरावर घेतलेला. जसा सात्त्विक तसाच करारी आहे. वयाने तो वृध्द आहे पण त्याच्या मनातील उमेदी तरुणाच्या आहेत. म्हणूनच त्याला वाटते - गावची शाळा भरभराटावी, नवी तालीम व्हावी, वाडीचा विकास व्हावा. मास्तराच्या आशा फलद्रूप झाल्या त्या कारभा-याच्या देहातील तरुण उमाळयाने. कारभा-याची सहानुभूती अथांग आहे. पण जेव्हा कर्तव्य आणि सहानुभूती यात संघर्ष निर्माण हातो - तेव्हा द्रष्टेही मोहित होऊन जातात. तेव्हाही कारभा-याने योग्य तो निर्णय केला आहे. म्हणूनच गावच्या न्यायदानात कारभा-याचे स्थान फार वरचे आहे. जणू ती गावची न्यायदेवताच आहे. ही न्यायदेवता आपणास कशी भासली याचे वर्णन करताना मास्तर सांगतात "मिशा पांढ-या झालेला एक म्हातारा हातातली काठी टेकत रानातून आला. त्याच्या भुवया-सुध्दा पांढ-या झाल्या होत्या. खांद्यावरचे जाडजूड कांबळे, त्याने रुप्याचे कडे असलेल्या हातांनी बळकट धरले होते. जोडयातील पाय ओढीत तो आला. माझ्यापुढे थांबला. कपाळावर हात घेऊन चुकलेले मेंढरु न्याहाळावे तसे न्याहाळले. डोक्याचे मुंडासे सोडले, अर्धे धोतर सोडले, तर त्याच्या अंगावर काही नव्हते ज्या मातीत तो दिवसभर मेंढरामागे हिंडला त्या मातीचा रंग त्याच्या देहाला लाभला

होता. तो काळाभोर झाला होता. अंग काठी सडसडीत. उघड्या पायावर झाडे-झुडपे लागून पांढरे धोट फरकाटे उठले होते. म्हातारा पार पिकला होता. कबुतराच्या पिसासारख्या भुवया. पांढ-याधोट भरघोस मिशा, बोटबोट वाढलेली पांढरी दाढी आणि छातीवरचे पांढरे कुरळे केस. वयाचा अंदाज बांधणे कठीण. पण म्हातारा पार थकला होता. चेह-यावर सुरकु-त्यांचे जाळे होते. हातापायाच्या शिरा फुगल्या होत्या. जागजागी गाठळल्या होत्या."[८] असा हा म्हातारा निवेदकाच्या सूक्ष्म संवेदनशील मनाने टिपला. म्हणूनच गंगाधर गाडगीळ म्हणतात. "माडगूळकरांच्या व्यक्ति चित्रणांत मात्र शारीराला विशेष महत्त्व आहे. त्या शारिराशिवाय त्यांनी निर्माण केलेल्या व्यक्तिमत्वांना पूर्णत्व येत नाही... अनेक शारिरीक लकबांना आणि वैशि-ष्टयांना त्यांच्या व्यक्तिचित्रणात विलक्षण महत्त्व आहे. मन आणि शारीर हयांमध्ये जो आपण कृत्रिम भेद करतो तो त्यांनी आपल्या व्यक्तिचित्रणात पुसून टाकला आहे."[3]

या कारभा-यांचे दर्शन जेव्हा मास्तरला घडते तेव्हा कारभा-याच्या अंगावरून माणदेशाचे दारिद्र, मातीचा चढलेला रंग, काटकपणा, सात्त्विकपणा, करारीपणा हे सगळे गुण त्या मातीने कारभा-यात निर्माण केले आहेत. म्हणूनच या मातीला जागून त्याला शाळा, तालीम व्हावी, वाडी भरभराटाला यावी असे वाटते. आयबु तालमीवरून पडला तरी तालमीच्या पेंड टाकण्याच्या कामात खंडपडू नये म्हणून मूर्च्छित पडलेल्या आयबूला घरात ठेऊन दार ओढून घेतो व कर्तव्याला सामोराजातो. मास्तर -अंजी - चोळी प्रकरणाने त्याच्या मनात बालटयाने विष कालवले. कारभारी संशयी बनला पण स्वत: खात्री करून घेतल्यानंतर मास्तराशी धरलेला अबोला सोडून तो एक प्रकारे मास्तराला शरणाच

गेला . एका कोवळया पोराला शरण जाताना त्यांने आपल्या पिकल्या केसांची दरकार बाळगली नाही. हे त्याच्या स्वभावातले औदार्य मास्तरच्या मनाला चटका लावून जाते. आयुष्यभर चांगले वागून राजाकडून "पाटील" म्हणून शाब्बासकीची थाप घेऊन, मावल्या आईने मृत्यूचा दृष्टांत देताच जीवनाचे सार्थक झाले समजून हा म्हातारा मृत्यूला न भिता सामोरा गेला. जणू कारभारी म्हणजे मास्तराच्या मते "बनगरवाडी"चे वैभव.तो जाताच "बनगरवाडी"ही ओस पडली. म्हणून प्रा. कृ.ब. निकुंभ लिहितात --"उभ्या गावावर आपला व्यक्तिमत्त्वाची पाखर घालणारा कारभारी. तो गेला आणि गाव अक्षरशः उघडे उघडे पडले. योगायोगाने का होईना, मरणाच्या दाराला लागले, वाडी उठून गेली . त्याची वत्सल छाया संपली आणि अंतर्बाह्य रखरखीत उन्हाळा वाडीत नांदू लागला ."[१०]

असे कारभारी आज ही खेडयापाडयातून आढळतात पण ते जुन्या पिढीचे प्रतिनिधी म्हणूनच उरले आहेत. पण "बनगरवाडी"तला कारभारी, नव्या जुन्यांचा मेळ घालणारा, द्रष्टा आहे. ख-या अर्थाने सा-या 'बनगरवाडी'च्या पांढरीची तो "आई" आहे.

## सारांश:

कारभा-याची व्यक्ति रेखा पाहिल्यावर असे दिसते की, ग्रामीण जीवनाचे एक वैशिष्टये म्हणजे सत् प्रवृत्तीच्या माणसाकडे गावचे पुढारीपणा जाते. कारभारी त्याच्या सत्स्वभावामुळेच गावचा पुढारी बनतो. म्हणूनच त्याला सारा गाव कारभारी म्हणतो. त्याचा सल्लाही गावाच्या हितासाठीच असतो. गावच्या पुढा-याचे प्रातिनिधिक चित्रण कारभा-याच्या रूपाने लेखकाने केले आहे.

कारभा-याला बाह्यजीवनाची जाणीव आहे. तो विचार करतो तो गावच्या हिताचा. तो गावाशी समरस होतो हा जसा एक नमुना आपणास पाहावयास मिळतो त्याच प्रमाणे जो व्यवसायाशी एकजीव झालेला आहे असा ग्रामीण माणसाचा काकुबा हा दुसरा प्रतिनिधि, लेखकाने वैशिष्टयपूर्ण रीतीने चित्रित केलेला आहे.

२) काकुबा:

"बनगरवाडी"च्या मातीशी ख-या अर्थाने एकरूप झालेली व्यक्ती म्हणजे काकुबा. काकुबाच्या मुलाने दिलेले रुपये जेव्हा बदलून घायला मास्तर गेला तेव्हा चुलीपुढे चिलीम ओढीत एक साठ-सत्तर वर्षाचा म्हातारा मास्तरला दिसला. व "हयो मा-जा बा" अशा शब्दात रामाने काकुबाची ओळख करून दिली. वयाच्या आठव्या वर्षापासून ७० वर्षापर्यंतच्या आयुष्यात त्याने केवळ मेंढरेच राखली. जणू मेंढराचे जीवन व त्याचे जीवन खाली मान घालून चालत आले होते. बाहय जगाकडे काकुबाने वा मेंढरांनाही पाहिले नव्हते. त्याचे केस पिकले होते. तोंडावर सुरकुत्याचे जाळे झाले होते. तरीही तो नातवाबरोबर काठी टेकत मेंढरामागे जात होता. राखण करण्याच्या अतिरिक्त सवयीमुळे जमीनीवर पडून झोप घ्यावी हे तो विसरला होता. बैल, घोडयासारखा तो बसल्याजागीच झोप घेत होता. कुत्र्याला यावा तसा लांडग्याचा वास त्याला येत होता. आणि रात्रीचा लांडगा आला तर तो मेंढक्यांना सावध करीत होता. त्याच्या घरात बुचर्डा छाप राणीचे रुपये गाडगेभर होते. भविष्यकाळाचा धनसंचय करणारा हा म्हातारा मोठा धूर्त होता, हुषार होता. दोन वर्षे उलटून गेली तर पैदास करायला आपल्या मेंढरांच्या लेकरांना तो अचूक ओळखत होता. हे त्याचे स्मरण-ज्ञान मोठे अजब होते. एवढी सूक्ष्म नजर कारभारी सोडला तर इतर मेंढक्यांना

नव्हती. "बनगरवाडी"वर त्याचा जीव इतका होता, की, दुष्काळाचे सावट वाडीवर येताच एकेक धनगर जड अंत:करणाने "जगण्यासाठी" वाडीचा निरोप घेत होते. परंतु जन्मभूमी म्हणजे काय हे प्रत्यक्ष न कळणा-या काकुबाने मोजक्याच शब्दात लेकाला म्हटले. "माजी माती हितंच पडलं."[११] त्याचा जीवनावरचा लोभ संपूर्ण गेला तरी "बनगरवाडी"च्या मातीवरला व मेंढरावरला लोभ संपला नाही. म्हणूनच लेकाला तो म्हणतो, "दोन ठिऊन (मेंढरं) जा. माझ्या भाकरीतली त्यांना घालून जतन करीन, निभंना झालं तर सगळीच मरून जाऊ."[१२] एकाद्या महान वृक्षा सारखा हा म्हातारा दुष्काळात एकाकी टक्कर देत राहिला. हा "बनगरवाडी"च्या मातीने आणि निसर्गाने त्याचा पिंड घडविला त्याचाच परिपाक होय.

३) बाळा धनगर:

बाळा धनगर थोडासा गावाशी फटकून दूर आपल्या शेतात वस्ती करून राहत होता. मास्तरला त्याचे पहिले दर्शन घडले ते आयबु, आनंदा तालमीसाठी त्याच्या शेतातील झाड मागण्यासाठी गेले.त्याचे दर्शनच मास्तरला घडले असे - एका जुन्या दाव्याला पड घालीत बाळा त्या लिंबाच्या सावलीला बसला होता. नुसत्या धोतराशिवाय त्याच्या अंगावर काही नव्हते. अरुंद कपाळ, पसरट नाक आणि सपाट हनुवटी या शारिरवैशिष्टयाचा बाळा धनगर एकाग्र चित्ताने तुटलेले दावे दुरुस्त करीत बसला होता. या बाळाने त्यांचे स्वागत केले तर नाहीच, साधे बसासुध्दा म्हटले नाही. मास्तरांनी त्याचे झाड मागताच त्याच्या नकाराची कळ त्याच्या चेह-यावर दिसली. तो हेकेखोर वाटला तो म्हणाला. "हे झाड मिळणार नाही."

"का बरं ?"

"माझी मर्जी"

"असं म्हणून कसं चालेल ?"
"बघीन कसं न्हाई भागत ते. मनगटात नेट
असेल तो झाड पाडील हे आन् न्हील."[१३]

या त्याच्या उद्‌गारातून त्याचा गर्विष्ठ, फटकळ स्वभाव दिसतो. "मला गाव नको आन् तालीम बी नको."[१४] अशा स्पष्ट शब्दात तो मास्तरची बोळवण करतो.

बाळा वरवर दिसायला गर्विष्ठ वाटला तरी तो सज्जन आहे. जे झाड गावकरी मागत होते ते त्याचे सर्वस्व होते. त्याच झाडीखाली त्याची गुरेढोरे, मुले बाळे सावली घेत विसावत होती. झाड आणि बाळा वेगळी नव्हतीच जशी काकुबा आणि मैंदरे वेगळी नव्हती तशी. म्हणूनच तो म्हणतो "झाडावर कु-हाड घालायच्या अगुदर माझ्या नरड्यावर घाला अन् मग खुशाल न्या."[१५] इथे काकुबा एवढीच माती. झाडावरची श्रध्दा पाहिली की, ग्रामीण मन कसे त्या मातीसारखे घडते हे दिसते. पुढे कारभारी वगैरे त्याची मनधरणी करतात पण तो म्हणतो, "पंतसरकार, इंग्रज साहेब आला तरी मी झाड देणार नाही. मला कोण फासावर देते ते पाहतो." इथे त्याचा स्वत:च्या भूमीवरील, मातीवरील, झाडावरील नितांत श्रध्दा दिसते. एवढेच नव्हे तर शेवटचा उपाय म्हणून बाळा धनगर त्यांला पांढरीचा धाक घालतो तेव्हाही तो म्हणतो, "मला पांढरीची जरुरी न्हाई, आज आठ साल मी माझ्या जमिनीत -हातोय. हितनं फुडं -हाईन. मला पांढरीचा धाक कशाला दाखवितोस. बोडकीला बावाचा धाक काय रं राम्या ?"[१६] आणि मग अशा गावाविरुध्द वागणा-या माणसाला गाव वाळीत टाकते हा इथला रीवाज आहे. कारण त्यामुळेच तो नमते घेईल. म्हणजे गावातील सर्वांनी गावासारखं वागावं ही

ही इथली रीत. पण ही रीत सोडून सुध्दा हा चिवट धनगर, गावाने पाणी बंद केले. वाळीत टाकले तर जगत राहिला. सा-या गावाने त्याला महारोग्यासारखा दूर ठेवला पण तो खचला नाही. ग्रामीण समाजात देवदैवतांचा विलक्षण पगडा ग्रामीण मनावर किती असतो. बाळाच्या स्माने मास्तरला कळून आले. मावल्या आईच्या यात्रेत पुजा-याने त्याला गुलाल लावण्यास, प्रसाद देण्यास नकार देताच हा ताठ माणूस देवीशक्तीला लव्हाळ्या-सारखा मऊ बनून शरण गेला. धोतराच्या नि-या फराफरा फेडून गावापुढे अंथरल्या, चुकीची क्षमा मागितली. तो म्हणतो, "माज्या पंढरीपुढं मी पदर पसरतो, माजी चुकी माफ करा. मला तुमच्यात घ्या. मला गुलाल लावा. तुमी माझं झाड घ्या, घर घ्या, माजा जीव सुदीक घ्या, पर मला असं लांब टाकू नका " या त्याच्या विनवणीत "मला तुमच्यात घ्या"[१७] या वाक्यात त्याच्या करुणेचा प्रत्यय तर येतोच पण गावकरी एखाद्या उर्मट माणसास कसे शासन देतात ही शासन व्यवस्थाच किती जबरदस्त आहे. शिवाय गावगाड्यात माणूस एकटा, स्वतंत्र राहूच शकत नाही. ही ग्रामीण सामाजव्यवस्थाच बाळाच्या वागण्याने मास्तराच्या प्रत्ययाला आली.

हाच बाळा लुळ्या बालट्याला पाठीवर घेऊन गाव सोडतो. शेवटी बालट्या, बाळा आपल्या वर्तनाने दुष्काळात गावाबाहेर पडले. जणू नियतीने त्यांच्यावर सूड उगविला. म्हणूनच बाळा धनगराबाबत प्रा. कृ.ब. निकुंब लिहितात --"एकदा वाडी आणि तो यातील झुंज उभी राहिल्यावर वाकायचे नाही, हे कृतनिश्चयी माणसाने पक्के ठरविले. हे अक्षरश: प्रवाहा-विरुध्द पोहणे होते, पण बाळा आत्मविश्वासाने हात मारीत राहिला."

कदाचित या त्याच्या मरणाने त्याची जिद्द संपविली असती. जर धर्म-श्रध्देचा नाजुक घाव त्याच्या अंत:करणावर पडला नसता तर. व्यावहारिक पातळीवर वाकावे असे बाळाच्या नखालाही कधी वाटले नसेल, पण धार्मिक पातळीवरच्या पराभवाने त्याचे अंत:करण दबून निघाले. त्याचे वाकणे सुध्दा विलक्षण उदात्त आहे. त्याच्या पराभवाने आपण जिंकल्याचा आनंद वाडीला वाटला नसेल. हा पराजयही त्याला विजयापेक्षा मोठा करुन गेला. आहे. म्हणूनच या उदात्त कारुण्याला उत्कटतेची उंची प्राप्त झाली आहे."[१८]
बाळाच्या रुपाने मास्तरला माणूस - धर्म - गाव यातील संघर्ष पहायला मिळून धर्मापुढे माणूस मोठा नाही हे ग्रामीण तत्त्व पहायला मिळाले.

सारांश- ग्रामीण जीवनात समाजाचे ऐकणे भाग पडते ग्राम जीवनात बहिष्कार (वाळीत टाकणे) हा व्यक्तिमत्त्वाचा कोंडमारा करणारा असतो. याचे चित्रण बाळा धनगराच्या रुपाने केले आहे. बाळा धनगर गावाशी फटकून वागतो पण गावगाडयात शेवटी गावाला/पांढरीला शरण जावेच लागते.

४) दादू बालटया:

दादू बालटयाचे प्रथम दर्शन मास्तरला "बनगरवाडी"त पाऊल ठेवताक्षणीच घडते. तो मास्तरांच्यापुढे येतो तोच मुळी डोक्याला तांबडया रंगाचा पटका. अंगात गोलसदरा, धोतराच्या टोकाबरोबरच उंच भाला हाती धरलेला, चेहरा मोठा, लांबोडका, गालाची हाडे वर आलेली, नाक सरळ, मिशातले केस काळे करडे होवून धुरकटयासारखे, तांबारलेले डोळे, मिशावरुन उगीचच बोटे फिरविण्याची सवय, व थुंकण्याचा परिपाठ. या कार्हीशा उग्र रुपाबरोबरच तो मास्तरला "अंडीवाला" म्हणून संबोधतो. त्यामुळे पहिल्यादांच बालटयाकडून मास्तर अपमानीत होतो.

बालटया तसा खलप्रवृत्तीचा नाही. परंतु गावावर वजन ठेऊन, टिवल्या बावल्या करून जगावे ही त्याची अपेक्षा व गावात मास्तर आलाकी आपले "वजन" कमी होते ही त्याची धारणा. म्हणूनच मास्तर जमातीवर उगीचच सूडाची भावना तो धरुन असतो. वास्तविक पाहाता मास्तराचे व त्याचे वैयक्तिक वैर नाही. परंतु गावावर वजन ठेवायचे म्हटले की, प्रबलाला दुर्बल केल्यावाचून चालत नाही. गावात मास्तर आली की बालटयाला गाव पुसत नाही म्हणूनच तो मास्तर जमातीवर "डूक" धरतो.

वास्तविक बालटया थोडाफार शिकलेला, वाचता-लिहिता येणारा. गावकरी त्यामुळेच त्याला सल्ला विचारत, आणि तालुक्याच्या अधिका-यांशी उठबस असल्याने गाव त्याच्या अंकीत आहे. म्हणजेच गावच्या आपल्या स्थानाला धक्का लागताच कुणीही माणूस करील तेच बालटया करीत आहे. म्हणूनच केळो-वेळी "का गा मास्तरा." असेच तो धमकी वजा मास्तराशी बोलतो. मास्तरला त्याच्याविषयी चीड आहे. पण तो व्यक्त करीत नाही कारण त्याला नोकरी करायची आहे. पाण्यात राहून माशाशी वैर करणे त्यालापरवडणारे नसते. कारण तो दुर्दशी आहे. आयबु व आनंदाकडून लुळा होऊनही गाव सोडताना तो बाळा धनगराच्या पाठीवर बसून मास्तरला दम देतो. "मास्तर . मी चाललो पर जगून माघारी ईन आन् तुजं बघीन - अरं, मला पक्कं माहीत हाय, तू माझं हातपाय मोडलंस "[१९] या दुबळया शारीरातील ही जिद्द त्या भूमीने, मातीने त्याला शिकविली. जीवनावरील त्याची लालसा मास्तरला थक्क करून सोडणारी आहे. "दूधतूप, साखरचपाती खाईन, बकरे, कोंबडया खाईन फिरून जवान होऊन उठेन"[२०] या त्याच्या उद्गारातील त्याची जीवन लालसा अधिकच गडद होते. असा हा ईर्षेबाज बालटया मनाने किती हलवा होता तर --

"मला राजाला बगायला यायचं हाय रे, पाठुकळी घेऊन तिथपतूर चला कुणी"[२१] म्हणून त्याची तडफड चालते. म्हणजेच "राजाला" बघणे हे आपले भाग्य आपण दवडता कामा नये हे त्या माणसाला कळत होते. पण काळानेच त्याची जिद्द संपविली, गाव सोडणे त्याच्या नशीबी आले. दादू बालटया हा मास्तरच्या व्यक्तिरेखेला उठाव देणारीच व्यक्तिरेखा आहे.

सारांश- "बनगरवाडी"त सत्प्रवृत्तीच्या जशा व्यक्ती आहेत तशाच कारणा-शिवाय दुष्टपणाने वागणाऱ्या रगेल व्यक्तीही आहेत. अशा व्यक्तीला आपल्या दुर्गुणाचे फळ भोगावे लागते. त्याचे चित्रण बालटयाच्या रुपाने केलेले आहे.

५) इतर व्यक्तिरेखा:

मास्तरांच्या नजरेने जशा या ठळक व्यक्तिरेखा पाहिल्या तशाच इतर व्यक्तिरेखाही पाहिल्या पाहिजेत त्यांचे "बनगरवाडी"तील स्थान कमी असेल पण त्यामुळे "बनगरवाडी"चे वैभव वाढतच आहे. चहा-बिडीवर जीवनाचा अंत करुन गेलेला वाणी, अतिशय भावनात्मक, हुषार, विद्याप्रिय सता, भावनात्मके-च्या बळानेच त्याने एकटयाने लांडगा तोडला ही धाडसीवृत्ती या मातीनेच त्यांच अंगी बानवली होती. आपल्या सुप्त सामर्थ्याने त्याच्यातील पौरुषत्व जागे झाले. विद्याप्रियता उडून गेली पण भावनात्मकता शिल्लक उरली. ती नसती तर रोगाने पटापट खांडातील मेंढरे मरताना पाहून तो रडलाच नसता. त्याची आईही मोठी बहाद्दर स्त्री. ती आपल्या पराक्रमी पोरावर खुष होते. व म्हण "कुत्रा मेला तो लांडग्याचे रगत घेऊन गेला. मेंढरु त्याच्यांवरुन ओवाळून टाकलं" या तिच्या उद्गारात मुक्या प्राण्याबद्दलची (कुत्र्याविषयी) अनुकंपा तर दिसतेच

पण तिचे मोठे मन दिसून येते.

आयबू तर निराश्रित, रोटी तुकडयावर कुत्र्यासारखा पडून राहणारा. इमानाला जागणारा, जणू कर्मभावनाच विसरून गेलेला. मास्तरांच्या बरोबर सावली सारखा उभा राहणारा. मास्तरांच्यासाठी बालटयाला मार देणारा "राजा" पहायला न मिळाल्याने दु:खी होणारा. तालीमीवरून खाली पडून बेशुध्द झालेला. तरीही एखादे दूधभात खाऊन मांजर झोपावे तसा आयबू मास्तरांच्या नजरेत होता. तो मास्तराच्या घरी सुखी होता. पण मास्तराच्या बदलीने हे सुख काळाने त्याच्याकडून हिरावून घेतले. तरीही मास्तरांचे गबाळे घेऊन त्याच्या पाठोपाठ जाणारा व हे गबाळं तुमच्या घरी टाकून मग मी माघारी जाईन"[२३] असे म्हणून शेवटपर्यंत साथ देणारा. मास्तरांना तर तो अधिक निराधार वाटतो. याचे पुढे काय होईल असा प्रश्न मास्तरांच्या मनात निश्चितच आला असावा. आयबू म्हणजे मास्तराचा एक शरीर भाग होता.

शेकू ही दुसरी व्यक्तिरेखा, पेरणीसाठी बैल मागण्यास तो मास्तरांच्याकडे येतो व मला एक बैल बघून दे म्हणून विनवणी करतो. शेकूच्या मते मास्तर म्हणजे अडीअडचणीला उपयोगी पडणारा. पण मास्तरांच्या लेखी शेकू म्हणजे हतबल, थोडासा चंचल, पत्नीचे प्रेम क्षणाकाळ का होईना विसरून "अंजी"च्या मागे धावणारा. व तिच्याशी लग्न करण्याचे स्वप्न बघणारा. परंतु शेवटी निराश होऊन परत येणारा.

तर धुळा धनगर मावल्याआईच्या यात्रेत अंगात येऊन घुमणारा, मावल्या आईचा पुजारी, बाळा धनगराला प्रसाद, भंडारा लावण्यास नकार देणारा भगत.

याशिवाय सर्वांचे आशास्थान पंतसरकार. "बनगरवाडी"च्या लेकरांचे कौतुक करणारे.

रामोशी मंडळी तर आगन्याच्या "बाई प्रकरणात" फुकट मार खाणारी, जातपातीची बंधने पाळणारी, चोरी, दारु गाळणे असे धंदे करुनही गावच्या नीति-नियमाशी बध्द राहणारी, तसेच व्हरल मंडळी, या सर्वांशी मास्तराचे विश्व बांधलेले आहे. या सर्वांशी मास्तरांचे संबंध अतिशय जिव्हाळ्याचे आहेत. म्हणून वांगीच्या लोकापुढे तो रामोशी लोकांना पाठीशी घालून पुढे होतो. त्यांचा मार वाचवितो. या सर्व पात्रांकडे पहाताना मास्तरला वाटते, "ग, म, भ, न" लिहायला शिकविणे एवढेच आपण करतोय पण यांची गरज वेगळी आहे. आयबूला कुटूंब पाहिजे. आनंदाला भाकरी पाहिजे, शेकूला बैल पाहिजे. अशा प्रकारे या सर्वांच्या भावभावना मास्तर उघडया डोळयांनी टिपत होता. त्यांच्या गरजा आपल्या परीने पु-या करण्याचा प्रयत्न करीत होता.

या सर्व लहान-सहान पात्रातून "बनगरवाडी"चे विश्व मास्तराला आकळत जाते. त्यांच्याशी मिसळून जगण्यातच त्याचा दूरदर्शीपणा दिसतो व या पात्रातूनच मास्तराचे व्यक्तिमत्त्व उजळत जाते.

६) नानी: (शेकूची बायको):

मास्तरच्या नजरेला "बनगरवाडी" मध्ये कारभा-या एवढीच कणखर व्यक्तिमत्वाची व्यक्ती भेटली ती म्हणजे नानी, कणखरपणाची मूर्तिमंत पुतळी. तिचे व्यक्तिमत्त्व थोडेसे पुरुषी आहे. गावातील सर्वसामान्य धनगरणी-पेक्षा ती मुंडाहात उंच आहे. तिच्या अंगी चांगली ताकद आहे व शेतकीची सर्व कामे ती पुरुषाच्या बरोबरीने करते. तिची कातडी ओढलेली आहे. पण या सा-या विसंगतेला झाकून टाकण्याएवढे तिच्या मनाचे सामर्थ्य अमर्याद आहे. पेरणीला बैल मिळाला नाही म्हणून नवरा (शेकू) कपाळाला हात लावून

बसला पण ही बहाददरीन जिद्दीने उभी ठाकली. बैलाबरोबर तिने टिपन ओढली. दिवसभार पेरणी केली. दुपारी भाकर खाल्ली. हा तिचा पराक्रम पाहून शेकूची तर वाचाच गेली. तिचे हे उदात्तरूप, साहस पाहून तो शारमिंदा झाला. म्हणूनच त्याने संध्याकाळी प्रेमाने तिची पाठ "तुडविली".

हे तिचे मोठेपण विसरून शेकू जेव्हा अंजीच्या नादी लागतो. तेव्हा ती चमत्कारी नाजूक प्रसंगात अडकली. तिने मनात आणले असते तर [illegible] अंजीला मनगटाला धरून हाकलून लावली असती. पण कारभाऱ्याने मरताना आपल्याला सांभाळायला दिलेल्या अंजीवर असा तिने अन्याय केला नाही. इथे मनगटाचा जोर कामाचा नाही हे नाजूक रहस्य या राकटबाईला जाणवले होते. म्हणूनच साऱ्या गावात विश्वासू माणूस म्हणून ती मास्तरांच्याकडे आली. मास्तराकडे ती आपले जखमी हृदय ओटीतल्या शेंगाआड लपवून आली व रिते करून गेली. शेकटी ती वेगळी राहिली. पण जेव्हा अंजी शेकूला सोडून दुसऱ्या मैतक्याचा हात धरून निघून गेली. तेव्हा नवरा परत आल्यावर ती निग्रही बाई आनंदाने नवऱ्याच्या घरी गेली. पुन्हा गाजरे घेऊन आपला हर्ष मास्तराकडे पोच करण्यास आली. तेव्हा ती म्हणाली, "मास्तर।, आलं आमचं खुळं माघारी.'[२४] इथे "खुळं", या शाब्दातच मास्तरला तिचे नवऱ्यावरचे प्रेम, हक्क, अधिकार, मनाचा हर्ष दिसून आला. ग्रामीण भागात मोठया कठोर मनाच्या, निग्रही, तितक्याच प्रेमळ स्त्रिया असतात. हा प्रत्यय नानीच्या रूपाने मास्तरला आला.

७) अंजी:

सगळया वाडीवर मायेची पाखर घालणाऱ्या कारभाऱ्याची अंजी ही नात आहे. ती काळीभोर आहे. मास्तरला तिचे पहिले दर्शन कारभाऱ्याच्या घरी घडले. पाण्याचा तांब्या उंबरठयात ठेऊन मास्तरकडे थोडे बघून ती घरात निघून

गेली. त्यानंतर एक दिवस अंगावरचे तांबडेभडक हातमागाचे लुगडे, हिरव्या खणाची चोळी घालून लाजत लाजत, लुगडे फडकफडक वाजवीत मास्तरच्या खोलीवर आली. मास्तरला ती लक्ष वेधून घेण्या इतपत नवी तरणी वाटली. मास्तरने तिचे वय चौदावे संपून पंधरावे लागले असावे असा अंदाज बांधला. तरीही ती उफाडयाची असल्याने वीस वर्षांची वाटत होती. मास्तरला ती लाजत लाजत म्हणाले, "माजी एवढी चोळी शिवून आणा.! .... चोरून करतीया बघा. म्हाता-याला सांगू नका आमच्या. रोजगार करून मी पैसं साटवलं आन् खण घेतला. दोन महिनं झालं,अजून शिवणंच झालं न्हाई. शिवून आनां म्हंजे पैसं दीन शिवनाळीचं"[२५] अस म्हणून मापाची चोळी व खण ती मास्तराच्या पुढयात टाकते.

मास्तरला अंजीची तारुण्यसुलभ नटण्यामुरडण्याची भावना कळून आली. तिच्या धाडसाचा हेवा करावा अशीच होती. एका परक्या पुरुषाबरोबर तिचे वागणेसुध्दा मास्तरला खटकले. एवढेच नव्हे तर आपण अंजीच्या नादाला लागलो असा बभ्रा गावभर होऊन खुद्द कारभारीही संशयग्रस्त बनला याचे मास्तरला वाईट वाटले. पण तो गप्प बसला.

पुढे हीच अंजी कारभा-याच्या मृत्यूनंतर शेकू बरोबर शृंगार चाळे करते. त्याला हुलकावण्या देऊन नादाला लावते. हा तिचा उच्छृंखलपणा मास्तरला खटकतो. ती नानीचा संसार तर उध्वस्त करतेच पण दणाकट मेंढया दिसताच शेकूला सोडून त्याच्याबरोबर निघून जाते.

वास्तविक पाहाता कारभा-यासारख्या शिस्तप्रिय, करारी धनगराच्या घरातील अंजीचे वागणे जरी तारुण्यसुलभ वाटले.तरी अंजीच्या वर्तनाबाबत

प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर लिहितात, "अंजीचे अखेरचे वर्तन काहीसे अनपेक्षित, खेड्यातील निरागसपणाची पातळी खाली आणणारे दिसते."[२६]

शेजवलकरांचे मत वरवर पहाता खरे असले तरी शेवटी स्त्री, स्त्रीमन अनाकलनीय होय. तसे नसते तर वांगीची बाई (मराठ्याची) रामोशाच्या-बरोबर पळून जाते याचा अर्थ काय लावायचा? शेवटी अंजी ही तारुण्यातील मुलगी, आजपर्यंत कारभा-याच्या बंधनात राहिलेली. बंधन तुटताच व शेकूचा पुरुष सहवास लाभताच तिच्या हातून शृंगार चाळे घडल्यास नवल वाटण्याचे कारण नाही. म्हणूनच मास्तरसुध्दा अंजीच्या वर्तनावर कुठे भाष्य करीत नाही.

फक्त ही प्रेम प्रकरणे शहरी नाहीत. शेकू पेक्षा दणाक्ट मेंढका दिसताच ती त्याचा हात धरुन गेली तेव्हा तिला काचोळीची शपथ घेतल्याचे भानसुध्दा राहिले नाही. हे तिचे धाडस, या मातीने, तारुण्याने शिकविले आहे. इथे आडपडदा कुठेही नाही. येथील प्रादेशिकतेचाच हाही एक आविष्कार म्हणावा लागेल.

८) जगन्या:

मास्तरच्या नजरेला जशी धनगर समाजातील व्यक्ती दिसल्या तशीच धनगर समाजाहून थोडासा खालच्या दर्जाचा समाज म्हणजे "बनगरवाडी"तील रामोशी समाज. दारु गाळणे, विकणे, चो-या करणे हे यांचे धंदे. तरीही त्यांनी आपल्या जाती बाहेर जावून आगळीक केलेली कुठेही दिसत नाही. अपवाद फक्त जगन्याचा. हा जगन्या आयबुचे निसटलेले हाड बसविण्याचे काम करताना

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

मास्तरांच्या सहवासात आला. हा रामोशाचा पोर स्माने चांगला देखणा, ऐन उमेदीत आलेला. त्याच्या बापाने खूप हरणे मारून शोक्टी तोही हरणासारखा हंबरून मेला.

परंतु या जगन्याने एक आगळीक केली. वांगी गावची विधवा बाईच त्याने पळवून आणली व तीही श्रेष्ठ कुळातील. ग्रामीण जीवनात खालच्या समाजाने वरच्या समाजाची कळ काढणे अनीतिमान मानले जाते. त्याने आपली पायरी सोडून वरच्या पायरीला हात घालताच सारा वांगी गाव येऊन "बनगरवाडी"तील धनगर रामोशी लोकांना त्रास देऊ लागला.

शोक्टी तो पळून गेला पण पकडला गेलाच. त्या बाईला तर आपले सौंदर्य गमवावे लागलेच पण दुष्काळात पोट आवळून (धोतराने) उपासपोटी काम करता करता जगन्या ग्लानी येऊन पडला तो उठलाच नाही.

मास्तरांच्या मते दैवाने जगन्याला शासन केले. व बाईला वाईट वर्तना-बद्दल गावकऱ्यांनी शासन केले. जगन्याची शोकांतिका मनावर ओरखडा उठवून जाते. मन थोडाकेळ अंत:र्मुख बनते. खुद्द जगन्याचे वागणे सुध्दा रामोशी लोकांना कमीपणाचे वाटते. तिथे इतरांचे काय ?

सारांश- या इतर व्यक्तिरेखापैकी शेकू आणि नानी या दोन व्यक्तिरेखांचे चित्रण करून माडगूळकरांनी एका कुटुंबाचे चित्र साकार केलेले आहे. पुरुष एखादे वेळेस "वाहवळा" गेला तरी त्याला आपल्या कुटुंबात परत यावे लागते व काही काळ अस्थीर झालेले, कौटुंबिक जीवन पुन्हा स्थीर होते. याचे चित्रण या दोघांच्या कुटुंबाच्या स्माने माडगूळकरांनी दाखविले आहे.

जातीपातीची श्रेष्टता ग्रामीण समाज टिकवून धरतो. वरिष्ठ समजल्या

जाणाऱ्या जाती हा आपला अहंकार जपत असतात. व कनिष्ठ जाती त्यांच्या अहंकारास मान्यताही देत असतात. हे ग्रामीण जाती व्यवस्थेचे यथातथ्य चित्रण जगन्याच्या उपकथेच्या द्वारा कादंबरीकाराने येथे रेखाटले आहे तसेच आयबूसारख्या परदेशी व्यक्तीला गावगाड्यात सामावून घेतल्याचे चित्रणही माडगूळकरांनी केलेले आहे.

## १) मास्तर:

"बनगरवाडी"च्या उलथापालथीचा साक्षीदार म्हणजे मास्तर, या मास्तरला "बनगरवाडी"तील कारभारी, बालट्या, अंजी, शेकू, नानी, आनंदा रामोशी, जगन्या, आयबू ही माणसे कशी वाटली ती आपण पाहिली. परंतु "बनगरवाडी"च्या गावकऱ्यांना, "बनगरवाडी"च्या वाचकांना तो कसा वाटतो याचेही चित्रण करणे महत्त्वाचे ठरते.

राजाराम विठ्ठल सौंदणीकर हा पोरसवदा तरीही सूज्ञ मास्तरकीची ऑर्डर घेऊन वाडीत पाऊल ठेवतो. तेव्हा त्याचा मळका लेंगा, रेघारेघांचा धुवट शर्ट पाहून दादू बालट्याला तो "अंडीवाला"च वाटला. कारण बालट्या त्याला विचारतो "काय अंडीवाला हायेस का गा ?"[२७] या त्याच्या प्रश्नाने त्याला मधूनच व आपण कोट टोपी न घातल्याबद्दल खेद वाटतो. बालट्याला वाटते हे गुडघ्याएवढे पोर मास्तर कसे असेल ? लंगोट लावून ज्याने शाळेत जावे आणि थुंकीने पाटी पुसावी, अशा पोराला मास्तरकोण म्हणेल ? जरी म्हणाले तरी त्याला मास्तर करील कोण ? म्हणजेच बालट्याच्या मते मास्तर म्हणजे शाळकरी पोर आहे. कारभाऱ्याला त्याच्या मास्तर मास्तरपणा बद्दल शंका नाही. कारण त्याला तो शाळा भरवायला सांगतो. पण त्याला "बाळा" या नावानेच

संबोधतो. मास्तराचा मोठेपणा कारभा-याला मान्य आहे. मास्तराला मदत केल्याचे फळ म्हणून मास्तरामुळेच आपणास पंत सरकारकडून "पाटील" ही उपाधी लाभली व आपले जीवन कृतकृत्य झाले. ही भावना कारभा-याच्या मनात आहे.

आयबुच्या मते तर मास्तर म्हणजे देव. आनंदा रामोशी जेव्हा पैसे चोरतो तेव्हा तो म्हणतो "लेका आनंधा, मास्तरचा पैका का रं घेतलास ? मास्तर काय जहागीरदार का सावकार ? त्याला हा धोका कशापायी ?[२८] किंवा जेव्हा शेकू मास्तरला बैल मागायला येतो तेव्हा तो म्हणतो "तू येडा काय रे शेकू ? मास्तरापाशी बैल कुठला ? ते काय शेतकरी का हेडे ? उगाच काहीबी मागायला याचं ? जा घरी !"[२९] म्हणजे मास्तर हा सावकार, शेतकरी, हेडा नाही. पण हे गावक-याना पटायला नको का ? गावक-यांच्या मते मास्तर म्हणजे जज्ज, पोलिस अधिकारी, पाटील कुलकर्णी, आणि स्टॅंप-व्हेंडरसुध्दा होता. म्हणूनच अंजी बिनदिक्कतपणे चोळी शिऊन आणायला सांगते. बाळा धनगर रुपये बदलून आणायला सांगतो, तर शेकू बैल मागतो. कुणी पत्रं लिहायला सांगतात. तर नानी आपलं भांडण मास्तरानी मिटवावं, नव-याला चार शब्द सांगून सुधारावे या भावनेने मास्तराकडे बघते.

याचाच अर्थ "बनगरवाडी"च्या गावक-यांच्यादृष्टीने मास्तर कुणी "परका" ही भावनाच नाही. ते त्याला आपलाच समजतात. आपल्या गावाला चांगली शाळा व तालीम बांधल्याबद्दल गावक-यांच्या मनात मास्तराविषयी दृढ विश्वास निर्माण होतो. एवढेच नव्हे तर पंत सरकारसुध्दा त्याला "छान छान, केलंस रे मुला हे तू . काय नाव तुझं ?" [३०] असे म्हणाले. म्हणजेच कारभारी,

बालटया, पंतसरकार या सर्वांच्या दृष्टीने मास्तर हे मूलच आहे. म्हणूनच कृ.ब. निकुंब लिहितात, "मास्तराचे वय कोवळे आहे आणि उत्साह हिरवा आहे. या दोन्ही गोष्टीत परस्पर सांगड आहे. बाल्य संपून गेले आणि तारुण्याचा नुकताच प्रारंभ झाला ...... या अवस्थेत मास्तराचे मन विलक्षण हळवे आहे ..... बालटयासारखा अपवाद सोडला तर सर्व गाव या तरुण पोराने फार लवकर आपल्या मुठीत आणले. मास्तर कोणाच्याही अडल्यास उभा राहतो हा विश्वास गावाच्या मनात निर्माण करणे एरवी शक्य झाले नसते."[३१]

म्हणाजेच हा विश्वास इतका जबरदस्त होता की, शेकू मास्तरला बैल मागायला येतो, राम्या बनगर पैसे बदलायला देतो व लवकर विचारपूसही करीत नाही. तसेच चोळीचे गुपीत मास्तरच राखील म्हणून अंजी चोळी मास्तरांच्या जवळ शिवायला देते. तीच गोष्ट नानीची. मास्तराला संसाराचा अनुभव नसुनही आपले "नाजुक 'दु:ख" परक्या पुरुषापुढे उघडे करते तेव्हा मास्तर तिला परका वाटातच नाही.

हा विश्वासही मास्तरला सहजासहजी प्राप्त झाला नाही. (त्याचे वागणे सहानुभूतीचे आहे. तालमीसाठी, शाळेसाठी तो नि:स्वार्थी बुध्दीने झाटतो. जीवाचे रान करतो. "पंत सरकारचे" आगमन हा "बनगरवाडी"च्या दृष्टीने सोन्याचा दिवस तो मास्तरांच्या मुळेच "बनगरवाडी"ला दिसतो. वाडीच्या जीवनात तो आपले व्यक्तित्व राखूनही सर्वस्वी मिसळला म्हणूनच त्याला हे यश लाभले.

मास्तर लहानखुरा असला तरी त्याचा आत्मविश्वास मोठा होता.

बळ मनगटात नसून मनात लागते हे त्याने वांगीच्या लोकापुढे ठाम उभे राहून सिध्द केले. ' बालट्याला मार देण्यापर्यंत आपले मन आपण खाली आवले याचे दु:ख त्याला होते. कारण तो संवेदनाशील आहे. म्हणूनच "बनगरवाडी" च्या रस्त्यावरील, चाको-या, झाडे-झुडपे, दगडगोटे, माळावरचे गुंडीकिडे, टोळ, मुंग्या सारख्या कृमिकीटकांचे, त्यांच्या पायाची मातीवर उमटलेल्या नक्षीचे, शेळया मेंढयाच्या लेंडया-मुताचे, धुराचे, दूध पित्या कोकराचे, कावळयाचें, बगळयांचे आवाजांचे त्यांच्याआकाराचे वर्णन सूक्ष्मपणे करतो. धनगरांचे नृत्यसमूह त्याला एक व्यक्ती वाटते. पायाखालची धूळ गार लागते. मेंढरे बे बे करुन ओरडतात ती "एकूलपणामुळेच" अशा वाक्यातून त्याची संवेदनशीलता त्याचे सूक्ष्म निरीक्षण, काव्यात्म मनाची प्रचीती येते. अशा प्रकारे रसिकांना व धनगर लोकांना मास्तर भावला.

- मास्तराच्या नजरेतून "बनगरवाडी"तील हया व्यक्ती अनघड, यंत्रदूर-जीवन जगणा-या, नशीबावर हवाला ठेवणा-या, अंधश्रध्दा, रुढी, परंपरा पाळणा-या एखाद्यावर प्राणापलीकडे विश्वास ठेवणा-या, तरीही दैवाधीन, निसर्गाच्या तालावर त्यांचे जीवन आंदोलन राहते. सुगीत फुलते तर दुष्काळात कोमजते. त्यांची भाषा, त्यांची शरीरे ही त्या माणदेशाच्या मातीने घडविली आहेत. म्हणूनच काकुबाआयुष्यभर बसूनच झोप घेतो व त्याला लांडग्याचा वास येतो. नानी गुरासारखे औत ओढते. तर बाळा धनगर एका झाडासाठी स्वत:च्या प्राणाची पर्वा करीत नाही की, गावालाही "धूप" घालीत नाही. रामोश्याचा पोर वरच्या पायरीला हात घालतो तर तालमीचे काम बंद पडू नये म्हणून कारभारी बेशुध्द आयबुला कोंडून ठेवतो. जगन्या पाखराचे जीवन जगतो. तरीही ही माणसे अगदी बालटयासह कुणेही वाईट अंत:करणाची नाहीत.

त्यांचे जगणे सरळमनाचे आहे. त्यांची जगण्याबद्दल, दारिद्र्याबद्दल तक्रार नाही. त्यांच्या फार मोठया अपेक्षाही नाहीत. म्हणूनच काय पाटील म्हणून पंत सरकारने गौरवताच कारभाऱ्याचे जीवन कृतार्थ होते. तर "मास्तर आलं आमचं कुळं माघारी" असं म्हणून नवरा परत आल्याचा आनंद नानी मास्तरापर्यंत पोच करते. तर दुर्बलापेक्षा सबळ बरा म्हणून अंजी शेकूचा हात सोडून दणाकट मैदक्याचा हात पकडून जाते. एखादे मांजर दुधभात खाऊन पडावे तसा आयबु सतत मास्ताराजवळ पडून आहे. त्याला भविष्याची चिंता नाही. तर काकुबा "माजी माती हितंच पडलं" म्हणून सारा गाव गेला तरी "बनगरवाडी" सोडत नाही व पाय मोडले तरी जाता जाता मास्तरला दम देण्यास बालटया विसरत नाही. हा सोशीकपणा, ही जिद्द, हा जीवनावरील विश्वास, निष्ठा माणसावरचा विश्वास या भूमीने या धनगरांना शिकविला.

सारांश- ह्या व्यक्ती विशिष्ट भूप्रदेशातील आहेत याचा प्रत्यय आपल्याला "बनगरवाडी"त येतो. प्रदेश आणि व्यक्ती यांच्या मध्ये असलेले जिवंत आंतरिक संबंध माडगूळकरांनी प्रत्यय कारीरीतीने या कादंबरीत चित्रित केलेले आहेत. "बनगरवाडी" या कादंबरी आधीच्या प्रादेशिक कादंबरीतील व्यक्तिरेखा ह्या पांढरपेशा कादंबरीकारांनी लिहिलेल्या कादंबऱ्यातील व्यक्तिरेखा प्रमाणेच चित्रित केलेल्या आहेत. त्यातील नायक प्रेमाला अथवा पराक्रमाला महत्त्व देऊन उदात्त मनोवृत्तीचे पराक्रमी व प्रभावशाली व्यक्तिमत्त्वाचे रेखाटले जात होते. नायकाची ही ठराविक कल्पना माडगूळकरांनी बाजूला सारून एका सर्वसामान्य व्यक्तीला कादंबरीत केंद्रस्थान दिले व इतर सर्व व्यक्तिरेखा, त्यांचा प्रादेशिकतेशी असलेला अंतरंग संबंध लक्षात घेऊन चित्रित केल्या. हे प्रस्तुत कादंबरीतील व्यक्तिचित्रणाचे वेगळेपण होय. यामुळे पारंपरिक मराठी कादंबरीच्या नायकाची कल्पना एक प्रकारे माडगूळकरांनी बदलून टाकली व

व्यक्तिचित्रणाला वेगळाच दृष्टिकोण देऊन कादंबरीची कक्षा रुंदावली असे म्हणावेसे वाटते.

या व्यक्तिरेखा रेखाटताना "बनगरवाडी"तील इतर व्यक्तिरेखांच्या चित्रणातून मास्तरांची व्यक्तिरेखा स्पष्ट होत जाते.

या "बनगरवाडी"त कारभाऱ्यासारखा सत्प्रवृत्तीचा माणूस असल्याने साहजिकच गावचे "कारभारीपण, मान त्याच्या - वाटयाला येतो. गावच्या भल्यासाठीच तो झटत असतो. तर काकुबा सारखा धनगर आपल्या व्यवसायाशी इतका एकरूप झालेला आहे की राखण करताकरता तो बसूनच झोप घेतो. लांडग्याचा वास त्याला बरोबर येतो. ऐबू सारखा परदेशी माणूस गावगाड्यात सामावून घेतला जातो. शेकू-व नानीच्या रूपाने महाराष्ट्रातील कुटुंबाचे प्रातिनिधिक चित्रण स्पष्ट होते व त्यातून महाराष्ट्रातील सोशिक स्त्री प्रकट होते.

"बनगरवाडी"त जशी सत्प्रवृत्तीची माणसे आहेत तशी दुष्ट प्रवृत्तीची माणसेही आहेत. बालटयासारखा अकारण द्वेष मास्तरांचा करणारा माणूस किंवा बळा धनगरासारखा गावाविरूध्द वागणारा माणूस यांना अंती त्रास ह्ल सोसावाच लागतो.

आनंदा रामोशा सारख्या खालच्या जातीच्या माणसाने वरच्या जातीच्या स्त्रीला पळवून नेल्यावर गावावर संकट येते. मास्तर ते निभावून नेतात. परंतु जात पातीची बंधने किती दृढ आहेत हेही स्पष्ट होते.

या सत्-दुष्ट प्रवृत्तीच्या माणसाशी जुळवून घेत मास्तर "बनगरवाडी"त शाळा व तालीम नावा रूपाला आणतो. हे करीत असताना गावातील

सर्वांची कामे पत्र लिहिण्यापासून ते चोळी शिवून आणण्यापर्यंतची, मास्तर करतो. व मास्तर सर्वांच्या विश्वासाला पात्र होतो. इतका पात्र होतो की, नवरा-बायकोतील नाजूक प्रश्न म्हणूनच,नानी मास्तरला येऊन सांगते. असा हा मास्तर "बनगरवाडी"त चलन वलन निर्माण करतो. सर्वांचा लाडका बनतो. (अपवाद - फक्त बालटया) व दुष्काळात बदलीची ऑर्डर आल्याने "बनगरवाडी" सोडून निघून जातो. जाताना सुध्दा मास्तरांना या धनगरांची भूमीवरील निष्ठा जाणवते. कारण दुष्काळात सुध्दा काकूबा धनगर माझी माती इथेच पडेल असे म्हणून "बनगरवाडी"त एकटाच राहतो. ही श्रध्दा त्याला या भूमीने शिकविलेली आहे.मेंढरे आणि वाडी यावर धनगरांची अपार माया आहे.

.....

## संदर्भ


१. ल.ग. जोग – "कादंबरी" चिरंजीव ग्रंथ प्रकाशन,पुणे, पृ. ११९.

२. द.भि. कुलकर्णी – "सत्यकथा", मे, १९७०.

३. "बनगरवाडी" – मौज प्रकाशन गृह मुंबई, आवृत्ती दहावी, पृ. ४

४. तत्रैव – पृ. ६

५. तत्रैव – पृ. ४

६. तत्रैव – पृ. ७२

७. तत्रैव – पृ. ८४

८. तत्रैव – पृ. ५

९. तत्रैव – पृ.

१०. प्रा. कृ.ब. निकुंब – "वैखरी" ए/मे/जू/जु/ऑ/सप्टें, १९७२

११. "बनगरवाडी" मौज प्रकाशन गृह मुंबई, आवृत्ती दहावी, पृ. ९७

१२. तत्रैव – पृ. ९७

१३. तत्रैव – पृ. ६४

१४. तत्रैव – पृ. ६४

१५. तत्रैव – पृ. ६५

१६. तत्रैव – पृ. ६५

१७. "बनगरवाडी" - मौज प्रकाशन गृह, मुंबई, आवृत्ती दहावी, पृ.९७.

१८. प्रा.कृ.ब.निकुंब - "वैखरी" ए/मे/जून/जुलै/ऑगस्ट/सप्टेंबर, १९७२.

१९. "बनगरवाडी" - मौज प्रकाशन,गृह मुंबई आवृत्ती दहावी, पृ. ९७.

२०. तत्रैव - पृ. ६८

२१. तत्रैव - पृ. ७४

२२. तत्रैव - पृ. ५०

२३. तत्रैव - पृ. १००

२४. तत्रैव - पृ. ८९

२५. तत्रैव - पृ. ३७,३८

२६. प्रा. त्र्यं.शं. शेजवळकर, "नवभारत" आक्टोबर/सप्टेंबर, १९५५-५६.

२७. "बनगरवाडी" - मौज प्रकाशनगृह, मुंबई, आवृत्ती दहावी, पृ. ४

२८. तत्रैव - पृ. ४४

२९. तत्रैव - पृ. ३१

३०. तत्रैव - पृ. ७३

३१. प्रा.कृ.ब. निकुंब - वैखरी, एप्रिल/मे/जून/जुलै/ऑगस्ट/सप्टेंबर, १९७२.

.....